| | |
|---|---|
| | **दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय**<br>**पत्ता:- आहिल्यादेवी होळकर उद्यान, यमुनानगर, निगडी, पुणे.**<br>**इमेल आयडी - piantideco.pcpc-mh@gov.in** |

**प्रेसनोट दिनांक ०२/०८/२०२३**

**खुनाच्या गुन्हयातील सुमारे ०९ वर्षापासुन कोर्ट फरारी असलेल्या आरोपीस दरोडा विरोधी पथकाने पकडलेबाबत.....**

मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चोबे सो. यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीतील रेकॉर्डवरील पाहिजे व फरारी आरोपींची बातमी प्राप्त करुन त्यांना ताब्यात घेवुन कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले होते.

त्यानुसार आमचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील दरोडा विरोधी पथकातील पोलीस निरीक्षक जितेद्र कदम, अधिकारी व अंमलदार हे पाहिजे व फरारी आरोपींची गोपनीय बातमी प्राप्त करीत होते.

दि.११/०२/२०११ रोजी ४० फुटी रोड हनुमान मंदीरा समोर, आळंदी देवाची, ता खेड, जि पुणे येथे इसम नामे अमोल जानक येवले,वय - १९ वर्षे, रा आळंदी देवाची, खेड, पुणे यांचा आरोपी नामे १. अर्जुन रमेश पुके, वय - २९ वर्षे, रा इंद्रायणी पार्क, पदमावती रोड,आळंदी,पुणे २. प्रशांत पुरुषोत्तम बोबडे, रा गोलेगाव,खेड, पुणे , ३. तुकाराम केरबा नेटके, रा केळगाव, ता खेड, पुणे व एक महिला यांनी जबर मारहाण करुन खुन केला होता. त्याबाबत आळंदी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड गुन्हा रजि. नंबर ०९/२०११ भा.द.वि.क. ३०२,३०७,१४३,१४७, १४८,१४९,५०४,५०६ अन्वये गुन्हा नोंद झाला होता. सदर गुन्हयातील आरोपी यांना आळंदी पोलीस स्टेशन यांनी अटक केली होती. त्यानंतर नमुद आरोपी यांना मा.न्यायालयाने ठराविक तारखेस हजर राहणेचे अटीवर जामिन मंजुर केला होता. परंतु आरोपी क्रं १ अर्जुन पुके हा मा.न्यायालयासमक्ष गैरहजर राहीलेला होता. मा.न्यायालयाने सन २०१४ मध्ये नमुद आरोपीस कोर्ट फरार घोषीत करुन त्यास न्यायालयासमक्ष हजर करणेचे पोलीसांना आदेश दिलेले होते.

मा.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिक्ष, खेड कोर्ट, पुणे यांचे कडे दाखल सेशन केस क्रं - ९२/२०१४ मध्ये मा न्यायालयाने दि.१८/०२/२०१९ रोजी निर्णय देते वेळी यातील आरोपी प्रशांत बोबडे व तुकाराम नेटके यांना दोषी सिध्द करुन आरोपी नामे अर्जुन रमेश पुके, वय - १८ वर्षे (सध्या वय - २९ वर्षे), रा - इंद्रायणी पार्क, पदमावती रोड, आळंदी देवाची, ता खेड, जि पुणे यास फरारी घोषीत करुन त्याचा शोध घेवुन त्यास मा न्यायालया समक्ष हजर करुन त्याचे संदर्भात पुरवणी दोषारोप पत्र सादर करणेबाबत तपासी अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

नमुद आरोपी हा सन २०१४ पासुन त्याचे स्वतःचे अस्तित्व लपवुन महाराष्ट्रामध्ये विविध ठिकाणी राहत होता. दरोडा विरोधी पथकातील **पोलीस नाईक १४५८ आशिष बनकर व पोलीस नाईक १६७४ सागर शेडगे** यांना सदर आरोपी हा टाकळी कुंभकर्ण, जिल्हा परभणी येथे स्वतःचे अस्तित्व लपवुन राहत असल्याची बातमी प्राप्त झाली. मा वरिष्ठांचे आदेशाने दरोडा विरोधी पथकातील पोलीस नाईक १०६२ गणेश हिंगे, पोलीस नाईक १४५८ आशिष बनकर, पोलीस शिपाई २०५५ समिर रासकर व पोलीस शिपाई २८६५ अमर कदम असे पथक तयार करुन टाकळी कुंभकर्ण, परभणी येथे पाठविण्यात आले. नमुद आरोपीचा सध्याचा फोटो तसेच त्याचे वर्णन याबाबत काहीएक माहिती नसताना नमुद पथकाने वेशांतर करुन तेथे स्थानिक बातमीदार तयार करुन आरोपीबाबत काहीएक उपयुक्त माहिती प्राप्त नसताना देखील अतिशय शिताफीने आरोपी अर्जुन पुके यास त्याचे टाकळी कुंभकर्ण या गावातुन ताब्यात घेतले. त्यास पुढील कार्यवाहीकामी आळंदी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आलेले आहे.

सदर कामगिरी मा. श्री. विनयकुमार चौबे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा श्री डॉ संजय शिंदे, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिं. चिं., मा. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, पिं चि., मा श्री माने सो. सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे , पिं चिं., मा श्री कोपनर सो. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे १, पिं चिं., यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. जितेद्र कदम, पोलीस निरीक्षक, दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अंबरिष देशमुख, पोलीस अंमलदार आशिष बनकर, गणेश हिंगे, समिर रासकर, अमर कदम, सागर शेडगे, विनोद वीर, राजेश कौशल्य, उमेश पुलगम, गणेश सावंत, नितीन लोखंडे, सुमित देवकर व राहुल खारगे सर्व नेमणुक दरोडा विरोधी पथक गुन्हे शाखा यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप आयुक्त,**
**गुन्हे शाखा, पिंपरी चिचवड**